**विशेष दिवाणी दावा क्र.१/२०१८**
**कासाबाई -वि- सुमित**
**निशाणी क्रं.२३ वर**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.१ प्रकाश याचा उलट तपास प्रतिवादी क्र. २ तर्फे</u>**

**<u>श्री.ओसवाल वकील साहेब यांचेकडून शपथेवर सुरु</u> -**

**२६.** हे म्हणणे खरे आहे की, दि.०९/०६/२००३ रोजी वादींनी प्रतिवादी क्र.१ यांच्या हक्कात नोंदणीकृत आम मुख्त्यारपत्र करुन दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे आम मुख्त्यारपत्र करण्याकरीता सर्व वादी सब रजिष्ट्रार यांच्या कार्यालयात गेले होते. हे म्हणणे खरे आहे की, दि.०९/०६/२००३ रोजी करुन दिलेले आम मुख्त्यारपत्र सन २०१७ मध्ये पहिल्यांदा नि.क्र.३७ प्रमाणे सुचनापत्र प्रतिवादी क्र.१ ला पाठवुन रद्द केले. हे म्हणणे खरे आहे की, वादी व प्रतिवादी क्र.१ मध्ये मोठी सामाजीक दरी आहे. आम्हा सर्वांना मराठी भाषा वाचता येते. प्रतिवादी क्र.१ हा माझ्या व वादीच्या समाजाचा नाही. प्रतिवादी क्र.१ सोबत आमचा भागीदारीचा व्यवसाय नाही. प्रतिवादी क्र.१ हा आमच्या घराच्या शेजारी राहात नाही. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही केलेल्या कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र.१ हा श्रीमंत व राजकारणी व्यक्ती असून आमचा प्रतिवादी क्र.१ सोबत सरळ संबंध येत नव्हता.

२७. दि.०९/०६/२००३ रोजी प्रतिवादी क्र.१ च्या नावाने करुन दिलेले आम मुख्त्यारपत्र शेतजमीनीबाबत होते. दि.०९/०६/२००३ पुर्वी किंवा त्यानंतर आम्ही प्रतिवादी क्र.१ च्या हक्कात कोणतेही दुसरे मुख्त्यारपत्र करुन दिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, दि.०९/०६/२००३ रोजी प्रतिवादी क्र.१ च्या हक्कात करुन दिलेल्या मुख्त्यारपत्राची प्रत त्या तारखेपासुन ते सन २०१७ पर्यंत दुय्यम निबंधक कार्यालयातून काढली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही प्रतिवादी क्र.१ च्या हक्कात नोंदणीकृत मुख्त्यारपत्र करुन दिले होते. याबाबत आम्हाला माहीत नव्हते की,

नोंदणीकृत दस्ताची प्रत कधीही प्राप्त होवु शकते. हे म्हणणे खरे आहे की, दि.१७/११/२०११ रोजी प्रतिवादी क्र.१ यांनी दि.०९/०६/२००३ रोजीच्या आम मुख्त्यारपत्राच्या अनुषंगाने प्रतिवादी क्र.२ यांना सर्व वादींच्या वतीने नोंदणीकृत विक्रीपत्र करुन दिले. हे म्हणणे खरे आहे की, सदरहु विक्रीपत्र करुन देण्यापुर्वी प्रतिवादी क्र.१ यांनी सर्व वादींच्या वतीने एसडीओ कार्यालयातून पुर्व परवानगी प्राप्त केली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे विक्रीपत्र झाल्यानंतर दि.२२/१२/२०११ रोजी प्रतिवादी क्र.२ च्या नावाने फेरफार करण्यात आला होता. हे म्हणणे खरे आहे की, फेरफार झाल्यानंतर मालमत्तेच्या सातबारा उताऱ्यातून वादींचे नावे कमी करुन प्रतिवादी क्र.२ चे नांव चढविण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, एसडीओ यवतमाळ यांनी विक्रीची परवानगी देतांना दाव्यातील मालमत्तेचे मुल्यांकन ₹९,४६,०००/- ठरवून रक्कम ₹ ७,०९,५००/- सरकारी टेझरीमध्ये जमा करण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदरची रक्कम प्रतिवादी क्र.२ यांनी शासनाला जमा करुन दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, उरलेली रक्कम वादींतर्फे प्रतिवादी क्र.१ यांना दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.२ यांनी ठरलेल्या बाजारभावाप्रमाणे वाद जमीनीची पुर्ण रक्कम अदा केली.

२८. एसडीओ कार्यालयातून वाद मालमत्ता विक्री करण्याबाबत दिलेल्या परवानगीच्या आदेशाविरुध्द आम्ही वरीष्ठ अधिकाऱ्यांकडे कोणतेही आव्हान दाखल केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, एसडीओ यवतमाळ यांनी विक्री करण्याकरीता दिलेली परवानगी आज देखील कायम आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमचा प्रतिवादी क्र.१ सोबत पैश्यांचा वाद झाला होता व आम्ही मागीतल्यावर त्यांनी विक्रीचे पैसे दिले नाही म्हणून वाद झाला. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.२ कडून प्राप्त केलेली विक्रीची रक्कम वादी क्र.१ ते ५ यांना न देता स्वत:जवळ ठेवली होती.

**विशेष दिवाणी दावा क्र.१/२०१८**
**कासाबाई -वि- सुमित**
**निशाणी क्रं.२३ वर**

प्रश्नः- सन २०११ मध्ये प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.२ सोबत व्यवहार केला, त्याबाबत तुम्हाला सुरवातीपासून माहीती होती व तसे तुम्ही नमुद केले आहे ?

उत्तरः- मला कल्पना नाही.

प्रश्नः- तुम्ही दाव्यामध्ये जागोजागी नमूद केले आहे की, प्रतिवादी क्र.१ व २ यांनी संगणमत करुन विक्रीपत्र करुन दिले, सदर बाब तुम्हाला सुरवातीपासून माहीत होती म्हणुन तुम्ही नमुद केले आहे ?

उत्तरः- मला विक्रीपत्राचे वाचन केल्यानंतर मला माहीत झाले.

प्रश्नः- अभिलेखावर दाखल केलेल्या विक्रीपत्रामधील कोणता मजकूर वाचून तुम्हाला असे आढळले की, प्रतिवादी क्र.१ व २ यांनी आपसात संगणमत केले आहे (साक्षीदाराला अभिलेखावरील विक्रीपत्र दाखवुन प्रश्न विचारले आहे.) ?

उत्तरः- मला तेवढी कल्पना नाही.

**२९.** हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ व २ यांनी आपसात संगणमत केल्याबाबत माझ्याकडे कोणताही पुरावा नाही. हे मला माहीत नाही की, प्रतिवादी क्र.१ व २ यांनी आपसात संगणमत केल्याबाबतचा नमुद केलेला मजकूर चूकीचा आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.२ ला विक्रीपत्र करुन प्राप्त केलेली रक्कम प्रतिवादी क्र.१ कडून वसुलण्याकरीता आम्ही कोणताही दावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.२ यांच्या हक्कात विक्रीपत्र झाले तेव्हापासून वाद मालमत्ता प्रतिवादी क्र.२ च्या ताब्यात आहे व सातबारा उताऱ्यावर त्यांच्या नावाची नोंद आहे.

प्रश्नः- प्रतिवादी क्र.२ यांना मालमत्ता विक्री केल्यानंतर त्यातील काही मालमत्ता शासनाने संपादीत करुन प्रतिवादी क्र.२ यांना मोबदला दिला होता, सदरची रक्कम वसुलण्याकरीता तुम्ही तुमच्या दाव्यामध्ये सुधारणा केली काय ?

उत्तरः- नाही.

३०. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तूत दाव्याव्यतिरिक्त मी दाखल केलेला नि.दि.दा. क्र.४७/२०१८ हा विनाशर्त मागे घेतलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.२ यांना जमीन संपादीत झाल्याची मिळालेली रक्कम आम्हाला नको होती म्हणुन आम्ही दाव्यामध्ये दुरुस्ती केली नाही. हे मला माहीत नाही की, प्रस्तूतचा दावा दाखल करण्यापुर्वीच शासनाने प्रतिवादी क्र.२ कडून जमीन संपादीत केली होती. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१६ मध्ये शासनाने संपादीत झालेल्या जमीनीबाबत मोबदला प्रतिवादी क्र.२ यांना देण्याबाबत अवार्ड पारीत केले होते. हे म्हणणे खरे आहे की, एसडीओ यांनी आदेश पारीत केल्यानंतर आम्हाला त्याबाबत माहीती मिळाली व दि.०६/०४/२०१८ रोजी आम्ही एसडीओ कडे आक्षेप दाखल केला. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही दाखल केलेल्या आक्षेपामध्ये एसडीओ यांनी प्रतिवादी क्र.२ चे जबाब मागीतले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रकरणात प्रतिवादी क्र.२ ने दाखल केलेल्या जबाबाची प्रत आम्हाला देण्यात आली होती. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.२ यांनी सदर आक्षेपाला दिलेला जबाब वाचून मी समजून घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.२ यांच्या जबाबामध्ये नमुद असलेल्या मजकुराबाबत मला पुर्ण माहीती असल्यामुळे मला ते वाचण्याची गरज भासली नाही.

३१. हे म्हणणे खरे आहे की, जमीन भोगवटदार -२ मधून भोगवटदार-१ मध्ये रुपांतर करण्याकरीता जमीन ताब्यात असणे आवश्यक आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन १९९७ मध्ये शासनाने वाद जमीन आमच्या ताब्यातून परत

घेतली होती व सदर जमीनीचा सातबारा उतारा शासनाच्या नांवाने झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, दि.०९/०६/२००३ रोजी ज्या दिवशी आम्ही प्रतिवादी क्र.१ च्या हक्कात मुख्त्यारपत्र करुन दिले त्यावेळी वाद जमीन आमच्या ताब्यात नव्हती.

प्रश्न:- दि.०९/०६/२००३ रोजी वाद जमीन तुमच्या ताब्यात नसतांना तुम्ही त्याचे मुख्त्यारपत्र भोगवटदार-२ मधून भोगवटदार-१ मध्ये रुपांतर करण्याकरीता प्रतिवादी क्र.१ यांच्या हक्कात कसे करुन दिले ?

उत्तर:- मला याबाबत कल्पना नव्हती.

**३२.** हे म्हणणे खरे नाही की, सन २०१५ मध्ये वाद मालमत्तेचा प्रतिवादी क्र.२च्या नावाने फेरफार झाल्यानंतर आम्ही वादींनी एसडीओ कडे अपिल केले होते. आम्ही वादींव्यतिरिक्त वाद मालमत्तेचा ईतर कोणीही मालक नाही. हे मला माहीत नाही की, दि.०१/१२/२०१५ रोजी एसडीओ यांनी सदरचे अपिल खारीज केले. हे म्हणणे खरे नाही की, दावा दाखल करतेवेळी आम्हाला दाव्याच्या चर्तु:सिमा माहीत नव्हत्या.

**३३.** प्रतिवादी क्र.१ यांनी नि.क्र.४९ वरील यादीसोबत दाखल केलेल्या दस्ताऐवजाबाबत मला माहीती नाही. हे म्हणणे खरे आहे की, वाद मालमत्तेबाबत जे काही प्रकरण झाले त्या प्रकरणांची माहीती आमच्या कुटूंबाच्या व्यक्तीशिवाय त्रयस्थ व्यक्तींना माहीती असणे शक्य नाही. मी अजीज अब्दुलभाई समनानी यांना ओळखत नाही. नि.क्र.४९ यादीसोबतचे दस्तऐवज आमचे नाहीत. सदर दस्ताऐवजांची छायांकित प्रत मला कोर्टातून मिळाली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर

दस्तऐवजांच्या छायांकित प्रति दि.२५/०९/२०२३ रोजी आम्हाला मिळाल्या. हे म्हणणे खरे आहे की, सदर दस्त मिळाल्यावर मी ते वाचून समजून घेतले. दि.२५/०९/२०२३ रोजी सदर दस्तांवर आमच्या सह्या नसल्याचे आम्हाला लक्षात आले होते. सदर दस्तावर आमच्या सह्या नसून अजीज अब्दुलभाई समनानी यांनी त्यावर खोट्या सह्या केल्या हया स्वरुपाचा पोलीस स्टेशनला तक्रार दिली नाही किंवा कोर्टात तक्रार दाखल केली नाही.

प्रश्नः- तुम्ही अजीज अब्दुलभाई समनानी यांना ओळखत नसल्याचे सांगुन त्यांनी आर्टीकल-बी वरील दस्ताऐवजामधील परीच्छेद क्र.१ व २ मध्ये नमुद असलेली तुमच्याशी व वाद मालमत्तेशी संबंधीत असलेली माहीती कशी प्राप्त केली, हे तुम्हाला माहीत आहे काय ?

उत्तरः- मला माहीत नाही.

**३४.** हे म्हणणे खरे आहे की, सदरचा दस्तऐवज मिळाला तेव्हापासून आजपर्यंत मी कोणतीही चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि.२५/०६/२००१ रोजी वाद मालमत्ता आमच्या ताब्यात नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्र.१ कासाबाई अंगठा करते व बाकीचे वादी सही करतात. आर्टीकल-बी मधील दस्तामधील मजकूर पुर्णपणे चुकीचा आहे.

**३५.** हे म्हणणे खरे आहे की, सन २०२३ मध्ये कोर्टातून दस्त प्राप्त झाल्यानंतर मला प्रतिवादी क्र.१ व अजीज अब्दुल समनानी यांच्यात झालेल्या सौद्याबाबत समजले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर दस्तऐवज बघीतल्यानंतर तो व्यवहार दि.१५/०५/२००३ चा असल्याचे मला समजले व सदर दस्तऐवजामधील मजकूर मला वाचल्यावर त्यादिवशी मला समजले. हे म्हणणे खरे आहे की,

**विशेष दिवाणी दावा क्र.१/२०१८**
**कासाबाई -वि- सुमित**
**निशाणी क्रं.२३ वर**

दि.०९/०६/२००३ रोजी आम्ही वादींनी प्रतिवादी क्र.१ यांना मुख्त्यारपत्र करुन दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, आर्टीकल-बी वर दाखल असलेल्या दस्तऐवजाप्रमाणे अजीज अब्दुल समनानी यांनी आम्हाला रक्कम दिली होती. हे मला माहीत नाही की, दि.०९/०६/२००३ रोजी आम्ही प्रतिवादी क्र.१ च्या हक्कात करुन दिलेल्या मुख्त्यारपत्रावर अजीज अब्दुल समनानी हा साक्षीदार आहे. (साक्षीदार दि०९/०६/२००३ रोजीचा मुख्त्यारपत्राचा दस्त दाखविण्यात आला.) हे म्हणणे खरे आहे की, सदर मुख्त्यारपत्रावर अजीज अब्दुलभाई समनानी यांचे नांव साक्षीदार म्हणून दिसत आहे.

**प्रतिवादी क्र.२ चे वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन पुढील उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

**श्रवणोत्तर स्वीकृत**

**(डि. ए. तिवारी)**
२रे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर),
यवतमाळ.
दिनांक – १८/०८/२०२५

**समक्ष**

**(डि. ए. तिवारी)**
२रे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर),
यवतमाळ.
दिनांक - १८/०८/२०२५